**ठळक बातम्या**

- राष्ट्रपतींच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रस्तावावरल्या चर्चेला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज लोकसभेत उत्तर देणार / राज्यभेत उद्या बोलणार
- संसद सभागृहात सदस्यांनी लोकशाही तत्त्वांचं काटेकोरपणे पालन करण्याचं प्रधानमंत्री मोदी यांचं आवाहन
- महाराष्ट्र विधानपरिषद निवडणुकीचे निकाल जाहीर / महायुती आणि महाविकास आघाडीला प्रत्येकी दोन जागा
- राष्ट्रीय चाचणी संस्थेमध्ये सक्षम यंत्रणा विकसित करण्यासाठी सरकारने विद्यार्थी आणि पालकांकडून सूचना मागवल्या.

**आणि**

- जॉर्डन इथं सुरू असलेल्या आशियाई कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत चार सुवर्ण, दोन रौप्य आणि दोन कांस्य पदकं पटकावून भारत अव्वल स्थानावर

**<><><><><>**

संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल आभार प्रस्तावावरच्या चर्चेला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज लोकसभेत उत्तर देणार आहेत. राज्यसभेत प्रधानमंत्री उद्या बोलतील, अशी माहिती संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी दिली. राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या संसदीय पक्षाची बैठक आज संसदभवनात झाली, त्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. संसद सभागृहात लोकशाही तत्त्वांचं आणि नियमांचं पालन काटेकोरपणे पालन करावं असं आवाहन प्रधानमंत्री मोदी यांनी या बैठकीत केलं, असं रिजिजू म्हणाले. संसदेतले लोकनियुक्त प्रतिनिधी कोणत्याही पक्षाचे असले तरी त्यांच्यावर देशसेवेची जबाबदारी असते, यावर प्रधानमंत्र्यांनी बैठकीत भर दिला. पर्यावरण, पाणी, आणि इतर सामाजिक महत्त्वाच्या लोकहिताच्या विषयात

लोकप्रतिनिधींनी अभ्यास करुन ज्ञान संपादन करावं, असंही आवाहन त्यांनी केलं. दिल्लीतल्या प्रधानमंत्री संग्रहालयाला प्रत्येक खासदाराने किमान एकदा सहकुटुंब भेट द्यावी असंही प्रधानमंत्री म्हणाले. या संग्रहालयात पहिले प्रधानमंत्री जवाहरलाल नेहरु यांच्यापासून विद्यमान प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यापर्यंत सर्व प्रधानमंत्र्यांविषयीची माहिती उपलब्ध आहे. सलग तिसऱ्यांदा प्रधानमंत्रीपद भूषवत असल्याबद्द्ल रालोआ संसदीय पक्षाच्या सर्व सदस्यांनी मोदी यांचा सत्कार केला.

**<><><><><>**

राष्ट्रपतींच्या अभिभाषणाबद्दलच्या आभारप्रस्तावावरची चर्चा संसदेच्या दोन्ही सभागृहात पुढं सुरु झाली. देशाची अर्थव्यवस्था जगात पाचव्या क्रमांकावर असूनही देशात दरडोई उत्पन्न कमी असल्याबद्दल समाजवादी पार्टीचे अखिलेश यादव यांनी सवाल उपस्थित केला. स्पर्धा परीक्षांचे पेपर फुटल्याच्या प्रकरणाचा उल्लेख करुन त्यांनी आरोप केला की या सरकारला युवकांना रोजगार द्यायचाच नाहीये.

काँग्रेसने भूतकाळात आपल्या मित्रपक्षांना नेस्तनाबूत केल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे सुनील तटकरे यांनी आपल्या भाषणात केला. राष्ट्रउभारणीच्या कामात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालच्या सरकारला महाराष्ट्रातलं महायुती सरकार पाठिंबा देईल, असं ते म्हणाले.

**होल्ड बाईट.... सुनील तटकरे**

राज्यसभेत तृणमूल काँग्रेसचे कल्याण बॅनर्जी यांनी, रालोआ सरकार राज्यांचे अधिकार काढून घेत असल्याबद्दल टीका केली. लोकसभा निवडणुकीत संविधानाविषयी चुकीचं कथानक पसरवण्यात आलं असं भाजपाचे अशोक चव्हाण यांनी सांगितलं. नीट परीक्षेतल्या घोटाळ्याची चौकशी करुन दोषींवर कठोर कारवाई झाली पाहिजे अशी मागणी त्यांनी केली.

**<><><><><>**

लोकसभेतले विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी काल लोकसभेत केलेल्या वक्तव्याचे पडसाद आज महाराष्ट्राच्या विधान भवनात उमटले. भाजप गटनेते प्रवीण दरेकर, आमदार आशिष शेलार यांच्यासह इतरांनी विधानभवनाच्या पायऱ्यांवर हातात फलक घेऊन जोरदार घोषणाबाजी केली. काल विधानपरिषदेत झालेल्या गदारोळावरून विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांना निलंबित करण्याची मागणीही त्यांनी केली. प्रत्युत्तरादाखल विरोधी पक्षाच्या नेत्यांनीही राज्यघटनेच्या प्रस्ताविकेच्या प्रती हातात घेऊन घोषणाबाजी केली. विधानसभेच्या कामकाजाची सुरुवात प्रश्नोत्तराने झाली. महाडच्या चवदार तळ्याच्या सुधारणेसाठी ६५ कोटींचा प्रस्ताव प्राप्त झाला असून त्याला १५ दिवसात उच्चस्तरीय समितीकडून मंजुरी देऊन, काम सुरू करू असं आश्वासन मंत्री उदय सामंत यांनी दिलं. बाबासाहेबांचे इंदू मिल येथील स्मारक, चवदार तळे येथील कामाबद्दल सरकार उदासीन असल्याचं विरोधी पक्षनेते विजय वड्डेटीवार यांनी आज विधानसभेत म्हटलं. नागपूर इथल्या दीक्षाभूमी इथं सुरू असलेल्या भूमीगत पार्किंगविरोधात आंदोलन करणाऱ्या आंदोलकांवर लाठीचार्ज करण्यात आला, भंतेजींच्यावर कारवाई करण्यात आली हे योग्य झाले नाही, असंही ते यावेळी म्हणाले. नागपूर येथील परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी अध्यक्षांनी पाहणीसाठी समिती पाठवावी, अशी मागणी वडेट्टीवार यांनी केली. जालना जिल्ह्यातल्या आंतरवली सराटीमध्ये ड्रोन द्वारे सर्वेक्षण सुरू असल्याचा आरोप विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी आज विधानसभेत केला. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांची सुरक्षा वाढवण्याची मागणी त्यांनी केली. त्यावर उत्तर देताना, मंत्री शंभूराज देसाई म्हणाले की, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी केली जाईल. आज विधानपरिषदेच्या कामकाजाची सुरुवात गदारोळातच झाली. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी काल लोकसभेत केलेल्या वक्तव्यावरून विधानपरिषदेत काल झालेल्या गदारोळावरून, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्याशी गैरव्यवहार

झाल्याचा दावा विरोधी पक्षांनी केला, तर अंबादास दानवे यांचं निलंबन करण्याची मागणी भाजप गटनेते प्रवीण दरेकर यांनी केली. त्यावर, 'सर्व घटनेचं ध्वनिचित्रमुद्रण बघून योग्य ती कारवाई करू', असं आश्वासन उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिलं. मात्र, तरीही गदारोळ न थांबल्यानं उपसभापतींनी सभागृहाचं कामकाज दुपारी १२वाजेपर्यंत तहकूब केलं. एक वाजता विधानपरिषदेचं कामकाज पुन्हा सुरु झाल्यावरही गोंधळ सुरुच राहिल्यानं उपसभापतींनी कामकाज पुन्हा एक तासासाठी तहकुब केलं.

<><><><><>

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या चार जागांसाठी झालेल्या निवडणुकीचे निकाल जाहीर झाले असून यात दोन जागांवर महाविकास आघाडी तर दोन जागांवर महायुती विजयी झाली आहे. मुंबईतल्या दोन्ही म्हणजे मुंबई शिक्षक आणि मुंबई पदवीधर मतदारसंघात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उमेदवारांनी विजय मिळवला. मुंबई पदवीधरमधून अनिल परब हे ४४ हजाराहून अधिक मतांनी विजयी झाले. तर शिक्षक मतदारसंघात शिक्षक भारतीचं सलग पंधरा वर्षांचं वर्चस्व मोडित काढत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे ज. मो. अभ्यंकर यांनी विजय मिळवला. कोकण पदवीधर मतदारसंघात भाजपाच्या निरंजन डावखरे यांनी सलग तिसऱ्यांदा विजय मिळवला. त्यांना एक लाखापेक्षा जास्त मतं मिळाली. तर नाशिक शिक्षक मतदारसंघात शिवसेनेचे किशोर दराडे हे विजयी झाले.

<><><><><>

विधान परिषदेच्या अकरा जागांसाठी द्वैवार्षिक निवडणुकीसाठी अर्ज भरण्याचा आजचा शेवटचा दिवस आहे. भाजपाचे उमेदवार पंकजा मुंडे, परिणय फुके, सदाभाऊ खोत आणि अमित गोरखे यांनी आज अर्ज भरले असून योगेश टिळेकर हे थोड्याच वेळात अर्ज भरणार आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसकडून राजेश विटेकर आणि शिवाजीराव गर्जे यांनीही आज अर्ज भरला.

<><><><><>

एनटीए अर्थात राष्ट्रीय चाचणी संस्थेमध्ये सक्षम यंत्रणा विकसित करण्यासाठी सरकारने विद्यार्थी आणि पालकांकडून सूचना आणि प्रतिक्रिया मागवल्या आहेत. माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात ही माहिती दिली आहे. डॉ. के. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखालच्या उच्चस्तरीय समितीला पालकांनी परीक्षा प्रक्रियेतल्या सुधारणा तसंच कार्यप्रणालीवर सूचना, विविध कल्पना कळवाव्यात असं आवाहन मंत्रालयानं केलं आहे.

<><><><><>

कझाकिस्तानच्या अध्यक्षतेखाली अस्ताना इथं ४ जुलैपासून  होणाऱ्या शांघाय सहकार्य संघटना परिषदेत सहभागी होणाऱ्या भारतीय प्रतिनिधी मंडळाचं नेतृत्व परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर करणार आहेत.  शांघाय सहकार्य संघटनेच्या सदस्य देशांच्या प्रमुखांची ही २४ वी बैठक असून या बैठकीत गेल्या दोन दशकातल्या विविध आंतरराष्ट्रीय घडामोडींची समीक्षा करण्यात येणार आहे. या बरोबरच सदस्य देशांमधील परस्पर सहकार्य आणि प्रांतीय त्याचप्रमाणे आंतरराष्ट्रीय मुद्द्यावर चर्चा होईल.

<><><><><>

जॉर्डन इथं सुरू असलेल्या आशियाई कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत २३ वर्षांखालच्या वयोगटात भारतीय कुस्तीपटूंनी ८ पदकं जिंकून अव्वल स्थान पटकावलं आहे. यात चार सुवर्ण, दोन रौप्य आणि दोन कांस्य पदकांचा समावेश आहे. या स्पर्धेच्या ७० किलो वजनी गटात अभिमन्यू याने, ९२ किलो गटात जॉन्टी कुमारी, ९७ किलो गटात साहिल जगलान आणि १२५ किलो वजनी गटात अनिरुद्ध कुमार यांनी सुवर्ण पदकाची कमाई केली. रोहित आणि जयदीप यांनी रौप्य तर शुभम आणि अमित यांनी कांस्य पदक पटकावलं.

**<><><><><>**

उत्पादन शुल्क घोटाळा प्रकरणी कारागृहात असणारे दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या अटकेला आव्हान देणाऱ्या याचिकेवर आज न्यायमूर्ती नीना बन्सल कृष्णा यांच्या पीठासमोर सुनावणी होणार आहे.

**//<><><><><>//**